**<u>अमरपालसिंघ रांघर विरुध्द</u>**

**विलोज को. हा. सो. ली.**

**<u>निशाणी.६३</u>**

**<u>दि. २५/०७/२०२५</u>**

वादीचे साक्षीदार क्रं. २ रविंद्र अरंविद रानडे यांचा शपथेवर सरतपास पुढे सुरु.

8. मी माझे पुराव्याचे प्रतिज्ञा पत्र निशानी ६३ वर दाखल केले असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. निशानी ३० च्या दस्त यादी सोबत अनु. क्रं. १ वर सी. डी. सी. रिर्पोट दाखल केला आहे. तो रिर्पोट हाच असुन त्यावर माझ्या कंपनीचा शिक्का असुन त्यावर माझी सही आहे. मी जी काही तपासणी केली त्याप्रमाणे रिर्पोट तयार केला आहे. माझ्या रिर्पोटमध्ये मी लिकेजची कारणे दिली आहे. माझ्या रिर्पोटमधील कथने खरी व बरोबर आहेत. त्यास निशानी ६५ देण्यात आला.

सरतपास पुर्ण.

साक्षीदाराचा उलटतपास प्रतिवादी संस्थेतर्फे ॲड श्री. पी. एस. कुलकर्णी यांच्या मार्फत सुरू.

९. हे म्हणणे खरे आहे की, कनस्ट्रक्शन डॉयग्नोस्टीक सेंटर प्रा. ली. ही कंपनी असुन त्यांचे मॅनेजींग डॉयरेक्टर रवी रानडे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, फ्लॅटची व टेरेसची माहिती मला वादी यांनी दिली आहे. वादीने मला जी माहिती दिली त्याची शहानिशा मी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना बोलावुन केली नाही.

१०. हे म्हणणे खरे आहे की, २०/०७/२०२० रोजी ज्यावेळी मी साईट व्हिजीट केली त्यावेळी मी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना बोलावले नाही किंवा वादीनांही बोलविण्यास सांगीतले नाही. मला वादीने सांगीतले की, फ्लॅटच्या टेरेसवर ३० पेक्षा जास्त छिद्रे आहेत. मी त्याची शहानिशा केली. मी माझ्या रिर्पोटमध्ये किती छिद्रे आहेत त्याची संख्या लिहलेली नाही. साक्षीदार स्वत:हुन सांगतात की, त्याचे

फोटो मी माझ्या रिर्पोटमध्ये जोडले आहे. हे म्हणणे खरे नाही की, किती छिद्रे आहेत याची मी शहानिशा केली नाही व त्याचे फोटो माझ्या रिर्पोटमध्ये जोडले नाही.

११. माझा रिर्पोट निशानी ६५ मधील पिरच्छेद क्रं. २ मध्ये मी जे कथने केली आहे, ती मला वादीनी सांगीतली आहे. साक्षीदार स्वत:हुन सांगतात की, परिच्छेद २ मधील काही कथने वादीनी सांगीतली तर काही मी स्वत्: तपासली आहे. हे म्हणणे खरे आहे की, टेरेस वर असलेली छिद्रे २५० एम. एम. ची आहेत का याची मी स्वत: खात्री केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, टेरेस वर जी काही छिद्रे होती त्या पैकी काही छिद्राना वॉटरप्रूफ करुन पॅचींग केलेली आहे. काही छिद्रे म्हणजे ४ छिद्रे ज्या मध्ये बोल्ट घातलेले होते. ज्या चार छिद्रामध्ये बोल्ट घातलेले होते त्याची माहिती मी वादी कडुन घेतली. ते चार बोल्ट सोलर पॅनल बसवण्यासाठी केली होती. पॅरापेट वॉल मध्ये जे क्रॅक होते त्याची मी स्वत: खात्री केली आहे. हे म्हणणे खरे आहे की, पॅरापेट वॉल मध्ये जे क्रॅक आहे त्यामधुनच वादीच्या सदनीकेमध्ये लिकीज आहे याची मी खात्री केली नाही. साक्षीदार स्वत:हुन सांगतात की, अशा स्वरुपाच्या लिकेजमध्ये एक किंवा अनेक कारणे असु शकतात, त्या पैकी पॅरापेट वॉल मध्ये क्रॅक हे ही एक प्रमुख कारण असते. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या रिर्पोटमध्ये जे फोटो दाखल केले आहे त्यामध्ये वादीच्या सदनीकेमधील क्रॅक व लिकेज दिसत नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या रिर्पोटमधील परिच्छेद क्रं. ७ मध्ये मी असे कथन केले आहे की, टॉयलेटमधील काही टाइल्सचे जॉइन्ट मोकळे आहेत तर काही टाइल्स क्रॅक आहे. त्यामुळे बाजुंच्या भिंतीमध्ये टॉयलेटच्या फरशांनमधुन मुरलेले पाणी केशर्कशणामुळे साधारण: २ ते ३ फुट उंची पर्यंतओल येऊ शकते त्या उंचीवरील ओल ही या कारणामुळे येऊ शकत नाही.

१२. माझ्या अहवालातील सुरूवातीच्या परिच्छेद मध्ये सदनीकेच्या विकत घेतल्या पासुन असलेल्या लिकेज बाबत मी जे कथन केले आहे ते बरोबर आहे.

१३. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या अहवाला मध्ये मी जे चार बोल्ट काढुन टाकण्यासाठी सांगीतले होते त्याबाबत काम केले म्हणुन संस्थेने मला फोन व मेल द्वारे कळवीले होते. मा. अपील न्यायालयाच्या आदेशानंतर संस्थेने ४ बोल्ट बाबत काय केले याची माहिती वादीने मला दिली नाही. निशानी ६५ चा अहवाल दिल्या नंतर कोर्टामध्ये पुरावा देण्यासाठी वादीने माझ्याशी संपर्क साधला. हे म्हणणे खरे आहे की, निशानी ६५ चा अहवाल झाल्या नंतर व कोर्टात साक्ष देण्यासाठी यावे लागेल हे सांगे पर्यंत वादीने माझ्याशी कोणताही संपर्क साधला नाही.

उलटतपास पूर्ण फेरतपास नाही.

समक्ष,

ANJU VIJAYKUMAR JADHAV

Digitally signed by ANJU VIJAYKUMAR JADHAV
DN: C=IN, O=BOMBAY HIGH COURT, Phone=39cfea0543823891cd44a70c9c57d718d7e2e30a8d3eb11a58ace4bc605f44d6, OU="BOMBAY HIGH COURT,CID - 6947785", PostalCode=400001, S=Maharashtra, SERIALNUMBER=0e10efacc33a9a5f54d01791e00d95e2c4bc21aade3e96c6851d525061228b4f, CN=ANJU VIJAYKUMAR JADHAV
Reason: I am the author of this document
Location: 12345678
Date: 2025.07.25 12:50:05+05'30'
Foxit PDF Reader Version: 2024.4.0

श्रीमती ए.व्ही.जाधव
न्यायाधीश
सहकार न्यायालय क्र. १ पुणे.

सही/-
साक्षीदार:- रविंद्र अरंविद रानडे
दिनांक:- २५/०७/२०२५
ठिकाण:- पुणे.